नियमित दिवाणी दावा ५३/१५
लिलाबाई विरुध्द किशोर

<u>निशाणी क्रं.१८ वर आदेश</u>

वादी यांचा अर्ज व प्रतिवादी यांनी त्यावर दिलेला खुलासाचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

२. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी डिसमिस इन डिफॉल्ट चा आदेश रद्दबातल करुन प्रकरण पुन्हा फाईलवर घेण्यासाठी अर्ज दाखल केला. वादी यांचे कथन की, प्रकरण हे पुराव्यासाठी ठेवले होते. परंतू मनोरमा यांचे पती दोन महिन्यापुर्वी वारले असून तिच्या वयोवृध्द सासूची तब्येत सुध्दा खराब असते. न्यायालयाने पुकारा केल्यानंतर ती हजर नव्हती. तसेच तिच्यातर्फे असलेले विधीज्ञ सुध्दा दुस-या न्यायायलाच्या कामकाजात व्यस्त होते त्यामुळे न्यायालयात हजर राहू शकले नाही. वादी मनोरमा हीला वेळ मिळाल्यावर ती लागलीच दुपारच्या सत्रात अंदाजे ०३.३० ते ०४.०० च्या दरम्यान कोर्टात हजर झाली व त्यानंतर तिला केस डी.आय.डी.झाल्याने समजले. वादी हिने कोणतेही जाणुनबुजून कृत्य केले नाही. अशापरिस्थितीत दावा पुर्नस्थापित करण्यात यावा व पुन्हा फाईलवर घेण्यात यावा अशी वादी यांनी विनंती केली.

३. प्रस्तुतच्या अर्जास प्रतिवादी यांनी पुरजोरपणे विरोध केला. न्यायालयाने पारीत केलेला आदेश हा योग्य आहे असे त्यांनी कथन केले. अर्जातील मजुकर हा संयुक्तिक नाही सबब अर्ज खारीज करावा व आदेश कायम ठेवावा अशी त्यांनी विनंती केली.

४. उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकून अभिलेखाचे अवलोकन केले असता. प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी घोषीत होवून मिळणेकरिता व अतिक्रमीत जमीनीचा ताबा मिळणेकरिता दाखल केला आहे. प्रस्तुतच्या प्रकरणात प्रतिवादी हे हजर झाले व त्यांनी नि.क्रं.१३ अन्वये त्यांचा लेखी जबाब दाखल केला. न्यायालयाने प्रस्तुतच्या प्रकरणात नि.क्रं.१४ अन्वये मुद्दे निश्चित केले. त्यानंतर प्रकरण हे पुराव्यासाठी लावण्यात आले. परंतू वादीतर्फे न्यायालयात कोणीही हजर नाही. अभिलेखावर वादीतर्फे साक्ष यादी नि.क्रं.१६ वर दाखल आहे. वादी यांनी प्रकरणामध्ये कोणताही पुरावा दाखल केला नाही किंवा न्यायालयात देखील ते हजर नाहीत. इतकेच काय वादीतर्फे देखील दि.०१.०४.१७ पासून प्रकरणात कोणी हजर आहे हे देखील दिसत नाही. न्यायालयाने दि.१२.०९.१८ रोजी प्रकरण हे कसुरीमुळे खारीज केले.

५. परंतू लगेच ०४.०० च्या दरम्यान वादी व त्यांचे विधीज्ञ हजर झाले. त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला. हा निव्वळ योगायोग म्हणावा की जी वादी किंवा तिच्यातर्फे कोणीही दि.०१.०४.१७ पासून न्यायालयात हजर नाही परंतू प्रकरणहे कसुरीमुळे खारीज केल्यानंतर काही अवधीच्या आत अर्ज व त्याच्या पृष्ठयर्थ शपथपत्र हे अभिलेखावर दाखल करण्यात आले. वादी

यांच्या काही वैयक्तिक कारणामुळे वादी हया न्यायालयात हजर राहू शकल्या नाही.  परंतू दाव्याची काळजी ही वादी यांनाच घ्यायची आहे.  दाव्यातील कारण हे संयुक्तिक नाही परंतू वादी यांना एक संधी द्यावी असे मला वाटते.  वादीयांनी ती वादी ही अनुपस्थितीत राहीली, त्यासाठी वादीचे वैयक्तिक कारण हे पुरेसे वाटते.  परंतू त्याचवेळी वादी ही साधरणपणे सोळा तारखांना न्यायालयात गैरहजर आहेत.  तसेच त्यांच्यातर्फे देखील प्रकरणात कोणीही हजर नाहीत.  यामुळे मला वादी यांच्यावर जास्तीत जास्त खर्च लादावा हे योग्य वाटते.  वादी यांच्यावर प्रत्येक तारखेनुसार १५०/- (अक्षरी एकशे पन्नास रुपये) प्रमाणे खर्च लादावा असे मला योग्य वाटते.  सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

- वादी  यांचा अर्ज २२५०/-(अक्षरी दोन हजार दोनशे पन्नास रुपये)रुपयांच्या कॉस्टवर मंजूर करण्यात येतो.  सदरची कॉस्टची रक्कम पैकी ११२५/-रुपये म्हणजे अर्धी रक्कम तालुका विधी सेवा समिती,जळगांव जामोदयांच्याकडे जमा करावी व उर्वरीत अर्धी रक्कम ही प्रतिवादी यांना अदा करण्यात यावी.
- निशाणी क्रं.१वरील दि.१२.०९.२०१८ रोजीचा आदेश हा अपास्त करण्यात येतो.
- वादी यांचा दावा हा पुन्हा फाईलावर आहे त्या स्थितीत घेण्यात यावा.

दि.१६/१०/२०१८ आर.बी.डोळे

जळगांव जामोद सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर

जळगांव जामोद